**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) कार्यालय**
पुणे महानगरपालिका
जा.क्र.: अतिमआ(ज)/साप्रवि/आस्था/ 9340
दिनांक 9/05/2022

## -: आदेश :-

**विषय :-** पुणे महानगरपालिकेकडील महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालय या पदाचे कामकाज व्यवस्थेबाबत.

पुणे महानगरपालिकेकडील महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालय या पदाचे कामकाजाबाबत खालीलप्रमाणे व्यवस्था करण्यात येत आहे.

महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालय या पदाचा अतिरिक्त पदभार या आदेशाच्या दिनांकापासून श्री. सोनवणे अनिल बंडोबा, उप अभियंता (स्थापत्य), बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालय यांचेकडे सोपविण्यात येत आहे.

श्री. सोनवणे अनिल बंडोबा, उप अभियंता (स्थापत्य) यांचेकडे असलेला कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालयाकडील अतिरिक्त पदभार या आदेशान्वये संपुष्टात आणण्यात येत आहेत. श्री. सोनवणे यांनी या आदेशाच्या दिनांकापासून पूर्णवेळ बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालयाकडे कामकाज करावयाचे आहे.

श्री. सोनवणे, उप अभियंता यांनी 'महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालय' या पदाचे अतिरिक्त कामकाज पुढील आदेश होईपर्यंत करावयाचे आहे.

श्री. सोनवणे, उप अभियंता यांनी वरीलप्रमाणे अतिरिक्त पदभार स्विकारलेबाबतचे निवेदन उप आयुक्त (परिमंडळ क्र. ५) यांचेमार्फत आमचेकडे सादर करावयाचे आहे.

तरी, संबंधित खातेप्रमुख यांनी जरूर ती पुढील तजवीज करावी.

Rawt
(रविंद्र बिनवडे)
**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)**
पुणे महानगरपालिका
18/5/2022

**प्रत :- खातेप्रमुख (सर्व)**, पुणे महानगरपालिका
यांजकडेस माहिती व पुढील तजविजीसाठी . . .